<u>**प्रेसनोट**</u> दि. १२/०७/२०२३

**विद्युत निरीक्षण कार्यालय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, सदाशिव पेठ, पुणे येथील वरिष्ठ लिपीक व चालकावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १५२/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - २९ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) सचिन विष्णु गाजरे, वय ३७ वर्ष, वरिष्ठ लिपीक (वर्ग-३)<br>२) बाळु काशिनाथ बिडकर, वय ५७ वर्ष, चालक (अति.कार्यभार - आवक जावक लिपीक) दोघे नेमणुक - विद्युत निरीक्षण कार्यालय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, सदाशिव पेठ, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १२,०००/- (बारा हजार रुपये) |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १२,०००/- (बारा हजार रुपये) |

पडताळणी दिनांक :- ०५/०६/२०२३ व दि. ०६/०६/२०२३.
गुन्हा दाखल दिनांक :- १२/०७/२०२३.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी विद्युत ठेकेदारीचा परवाना मिळण्यासाठी विद्युत निरीक्षण कार्यालय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, सदाशिव पेठ, पुणे येथे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन अर्ज केला होता. सदरचा विद्युत ठेकेदारीचा परवाना चौकशीसाठी तक्रारदार सदर कार्यालयात गेले असता, विद्युत ठेकेदारीचा परवाना देणेसाठी कार्यालयातील लोकसेवक क्र. १ सचिन गाजरे यांनी लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक क्र. १ सचिन गाजरे यांनी तक्रारदाराकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक क्र. २ बाळु बिडकर यांनी तक्रारदार यांची फाईल आवक जावक टेबलवरुन पुढे पाठविण्यासाठी २,०००/- रुपये लाचेची मागणी केली म्हणुन वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.